सकाळ

# यशवंत विद्यालयात 'फ्लाइंग यंगस्टर्स' गट स्थापन

**धायरी :** क्विक हिल फाउंडेशन व पंख संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या शाळांगण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या यशवंत विद्यालय, खडकवासला येथील विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, ठामपणा, संघटन कौशल्य, आव्हान स्वीकारणे अशा प्रकारचे विविध गुणांचा शोध घेऊन त्यांचा गट बनविण्यात आला व या गटाला 'फ्लाइंग यंगस्टर' असे नाव देण्यात आले.

या गटातील मुलांमध्ये असणाऱ्या उपजत गुणांचा व ऊर्जेचा योग्य ठिकाणी वापर करून; त्याद्वारे मुलांना जबाबदार पाल्य, जबाबदार विद्यार्थी व देशाचा जबाबदार नागरिक बनविण्यासाठी प्रोत्साहित करणे, असा गट निवडण्यामागील उद्देश आहे. त्यामुळे या मुलांनी आपल्या दिशेकडे वाटचाल सुरू करण्याआधी या मुलांना 'शाळांगण फ्लाइंग यंगस्टर्स' नावाचे बॅचेस देऊन शाळेतील शिक्षक, मान्यवर व्यक्ती व विद्यार्थी वर्गाकडून प्रोत्साहित करण्यात आले.

कार्यक्रमासाठी क्विक हिल कंपनीचे अजय शिर्के, पंख संस्थाप्रमुख स्मिता आपटे, यशवंत विद्यालयाचे पर्यवेक्षक संजय बांदल, शिक्षिका शीतल चौरे, वैशाली येवले, इतर शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. अजय शिर्के आणि स्मिता आपटे यांनी 'शाळांगण फ्लाइंग यंगस्टर्स' गटाला त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मोलाचे मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे नियोजन शाळांगण समुपदेशक श्वेता सूर्यवंशी, सचिन भापकर व मृणाल मापुस्कर यांनी केले.



खडकवासला : यशवंत विद्यालयात 'फ्लाइंग यंगस्टर्स' गट स्थापन करण्यात आला.